I J R S S I S, Spl Issue (IV), March-2022 : 283-285 OPEN ACCESS e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
A Double-Blind Peer Reviewed Journal Original Article
Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATIONwww.ijrssis.in

# चंद्रपूर लोकसभा मतदार संघातील मतदारांच्या मतवर्तनाचे चिकित्सक अध्ययन

श्री. निलेश चंपतराव काळे व डॉ. एन. आर. चिमुरकर

उच्च शिक्षण व संशोधक केंद्र (राज्यशास्त्र)
सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर

Communicated :20.02.2022 | Revision : 15.03.2022 Accepted :25.03.2022 | Published: 30.03.2022

**सारांश :**

जगात सर्वात मोठी लोकसंख्या असलेला भारत देष आहे. यात निवडणूक प्रकीया तेवढीच विशाल स्वरूपाची आहे. निवडणूकीतील मतदारांची संख्या, मतदान केंद्र आणि कर्मचारी वर्ग यावरील खर्च इत्यादी सर्व प्रकाराने भारतीय लोकप्रतिनिधीच्या निवडणूका हा प्रचंड विस्ताराचा कार्यक्रम आहे. आणि या संपुर्ण कार्यक्रमाची जबाबदारी हि भारतीय निवडणूक आयोगावर आहे.

या संदर्भात चंद्रपूर लोकसभा मतदार संघातील मतदारांच्या मतवर्तनाकडे पाहिल्यास असे दिसुन येते की, या संघातील मतदारांवर विविध गोष्टींच्या प्रघात हा मतवर्तनावर दिसून येतो की, ज्या प्रमाणे राष्ट्रीय व प्रादेशिक स्तरावर असामाजिक तत्व, प्रसारमाध्यमे, विचारसरणी, राजकीय विचारधारा पैशाची ताकद, अल्पसंख्यांखाची असुरक्षेतेची भावना आणि भ्रष्ट असा निवडणूक प्रचार व चंद्रपूर जिल्हयात दारूबंदी इत्यादी घटक मतवर्तनात प्रभावित करणारे महत्वाचे घटक आहे. काही प्रमाणात हेच घटक चंद्रपूर लोकसभा मतदार संघातील व्यक्तीच्या मतवर्तनावर प्रभाव टाकतांना दिसतात.

**बीजशब्द :** निवडणूक, मतवर्तन, मतदार, मतदान, राजकीय, प्रभावित

**प्रस्तावना :**

भारत हा प्रतिनिधीक लोकशाही देश आहे. व या देशात जनता हि आपला राजकीय प्रतिनिधी मतदान प्रक्रीयेद्वारे निवडत असतो.

राष्ट्रीय स्तरावर लोकप्रतिनिधीची निवड करण्याकरीता सन २००१मध्ये मतदार संघाची पुनर्रचना करण्यात आली.

साधारण महाराश्ट्रात ४८ लोकसभा मतदार संघाची निर्मिती करण्यात आली. व यामध्ये चंद्रपुर मतदार संघाची निर्मिती सुध्दा करण्यात आली.चंद्रपुर लोकसभा निर्वाचन क्षेत्रातील समावेश असलेल्या तालुक्यांची संख्या १६ आहेत. यात एकूण ६ विधानसभा मतदार संघाचा समावेश आहे. वरोरा, बल्लारपूर, राजुरा, चंद्रपूर वणी व आर्णी तसेच चंद्रपूर मतदार संघात एकूण १७,५३,६९० ऐवढे मतदार आहेत. त्यापैकी २,०९,२१,०९५ पुरूष व ८,३२,५९५ स्त्री मतदार आहे. एकंदरीत या प्रकारचे स्वरूप आहेत. चंद्रपूर लोकसभा मतदार संघातील मतदार हे विविध घटकांनी प्रभावित होवून मतदान करतांना दिसून येते.

चंद्रपूर लोकसभा निर्वाचन क्षेत्रात गेल्या काही वर्षी पासुन औद्योगिकरण, मादक पदार्थ, शेतकरी समस्या, बेरोजगारी,कोळसा उद्योग समुह या प्रादेशिक मुद्यांना अनुसरून या क्षेत्रातील मतदार प्रभावित होवून मतदारांचे मतवर्तन होतांना दिसते.

**१) जातीयता, धर्म यांचा प्रभाव:–**

भारतीय राजकारणात जात, धर्म, भाषा वंश असे अनेक असामाजिक तत्व आहेत व यांचा प्रभाव हा भारतीय राजकारणात मोठया प्रमाणावरती दिसून येतो, यात राष्ट्रीय पक्ष, प्रादेशिक पक्ष व स्थानिक पक्ष हे उमेदवार निश्चित करतांना या घटकांचा आधार घेवून लोकप्रतिनिधी निवडत असतात.व या असामाजिक तत्वांना जिवंत ठेवून जनतेचा भावना मत जिकंलात त्यामूळे.भारतीय जनतेमध्ये जात, धर्म भाषा या गोष्टी खोल मनावर रूजलेला आहेत. व या घटकांचा आधार घेवून जनता आपले मतदान व्यवहार ठरवीत असते.

चंद्रपूर लोकसभा मतदार संघात विविध स्वरूपाचा जाती आणि धर्म आहेत. जात कुणबी, तेली, आदिवासी, नवबौदध व धनगर इत्यादी हि जनता आपल्या आपल्या हितसंबधाचा संवर्धना करीता जात धर्म हे घटक बघून मतदान व्यवहार करतांना दिसतात. लोकप्रतिनिधी हा कुणबी जातीचा असेल तर कुणबी लोक त्या प्रतिनिधींना मत देतात. या प्रमाणे विविध स्वरूपाचे जातीचे व धर्माचे प्रतिनिधींना जात व धर्म पाहून या मतदार संघातील जनता हि मतदान व्यवहार करतात. उदा. सुरेष धानोरकर हे या मतदार संघातील सद्यस्थितीत लोकप्रतिनीधी आहे. व यांच्या निवडी करीता जात व धर्म हे घटक महत्वपूर्ण ठरल्याचे दिसून येते.

**२) राजकीय विचारसरणी:–**

राजकीय विचारसरणीचा मतदारावर मतवर्तनाचा प्रभाव पडत असतो. आणि जनता ही नेहमी त्या विचारसरणीचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या राजकीय पक्षाला मत देतात.

चंद्रपूर मतदार संघात भाजपा, कांग्रेस, राष्ट्रवादी कांग्रेस, शिवसेना, बीएसपी,आरपीआय व मनसे इत्यादी राष्ट्रीय व राजकीय प्रादेशिक पक्ष आहेत. व यांची प्रत्येकी वेगळी

राजकीय विचारसरणी असते.या ठीकाणी जनता हि या विचार सरणीला अनुसरून मतदान व्यवहार करतांना दिसतात.

**३) व्यक्तीपुजक नेतृत्व:–**

मतदार वर्तनावर पक्षनेता व व उमेदवाराचा व्यक्तीमत्वाचा नेहमी प्रभाव पडतो.१९४७ ते १९६४ पर्यन्त व्यक्तीमत्वाचा प्रभावामुळे लोक कांग्रेस पक्षाला प्रचंड मतदार मतदान करत होते. १९७५ ते १९८४ या काळात इंदिरा गांधीच्या व्यक्तीमत्वाचा प्रभावामुळे मतदार इंदिरा गांधीच्या सरकारला प्रचंड बहुमताने निवडून देत होते. २०१४ च्या १६ व्या लोकसभा निवडणूकीत नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात व यांच्या व्यक्तीमत्वाचा प्रभावामुळे मतदारांनी त्यांना लोकसभेत प्रचंड बहुमतांनी विजय प्राप्त करून दिला.

महाराष्ट्रात बाळासाहेब ठाकरे, शरद पवार बिहारमध्ये लालुप्रसाद यादव नितीश कुमार, तामिळनाडूत जयललिता पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनजी, आणि दिल्लीत विधानसभा निवडणूकीत अरविंद केजरीवाल यांच्या व्यक्तीपुजक नेतृत्वावर जनतेने आज पर्यन्त विश्वास दाखवला तसेच चंद्रपूर मतदार संघात कधी कांगेस नेते तर कधी बीजेपी व अन्य पक्ष नेत्यांच्या व्यक्तीपुजक नेतृत्वाचा प्रभाव जनतेवर आहे. आज पर्यन्त विविध पक्षाच्या नेतत्वात व्यक्तीमत्वाचा प्रभावामुळे या मतदार संघात कधी कांग्रेस तर कधी बीजेपी उमेदवार मतदारांकडून निवडल्या गेले अशा प्रकारे व्यक्तीपुजक नेतृत्व हे या मतदार संघात प्रभावी आधार आहे.

**४) लाटीचा प्रभाव:–**

भारतीय राजकारणात मतदान वर्तनावर राजकीय व्यक्तीमत्वाचा लाटीचा प्रभाव हा राष्ट्रीय पातळी पासून ते स्थानिक पातळीपर्यन्त दिसून येतो. यात इंदिरा गांधी यांची लाट त्यांच्या मृत्युनंतर राजीव गांधी याच्या करीता असलेली सहानुभूतीची लाट व २०१४ नंतर नरेंद्र मोदी यांची लाट यात मतदार हा एकाच नेत्याकडे कल धरू लागल्याचे दिसते.या लाटीचा प्रभाव चंद्रपूर लोकसभा मतदार संघात दिसून येतो, म्हणून २०१४ नंतरच्या लोकसभा निवडणूकीत या क्षेत्राचे प्रतिनिधी हे नरेंद्र मोदीच्या लाटेच्या प्रभावाने श्री हंसराज अहिर निवडून आल्याचे दिसते.

**५) परंपरा व अल्पसंख्याकाची असुरक्षितता :–**

चंद्रपूर लोकसभा मतदार संघात अनेक मतदार परंपरेचा प्रभावाने विशिष्ट पक्षाला मतदान करतांत. काही लोक पिढयांन पिढया एकाच पक्षाला मतदान करतात.. यात कांग्रेस व जनसंघाला (बीजेपी) या पक्षाला पिढयांन पिढया मतदान करणारे आहेत. तसेच या मतदार संघात धार्मिक व जातीय अल्पसंख्याकाची गट आहेत. यांना नेहमी ही बहुसंख्याकाद्वारे अत्याचार होण्याची असुरक्षितता वाटत असते. त्यामुळे हे गट नेहमी संघटीत राहतात.आणि नियमित त्यांच्या नेत्याच्या म्हणण्यानुसार मतदान करीत असतात. याचे उदाहरण मुस्लिम समाज इत्यादी.

**६) स्थानिक कामगार, शेतकरी व उद्योग समुदाय:–**

चंद्रपूर लोकसभा मतदार संघात विविध स्वरूपाचे उद्योग समुदाय आहेत. कोळसा उद्योग, विज निर्मिती केंद्र उद्योग समुदाय, शेतकरी व कामगार समुदाय या समुदायात असलेले कामगार शेतकरी वर्ग हा फार मोठया प्रमाणात आहे. यांच्या अनेक उद्योग समुदायाच्या संघाला राजकीय पक्षाच्या स्वरूपात आहे. त्यामुळे या समुदायावर नेहमीच राष्ट्रीय व प्रादेशिक पक्ष आपला प्रभाव टाकत असतो. व आपल्या सोईनुसार मतदान वर्तन घडवून आणण्याच्या प्रयत्न करीत असतो.

तसेच या समुदायाचे आर्थिक प्रशासकीय व स्थानिक समस्यांची सोडवणूक या राजकीय पक्षामार्फत केल्या जाते. म्हणून हे समुदाय आप आपल्या बांधिलकी असलेल्या राजकीय पक्षाला मतदान करतात.

**७) स्थानिक समस्या व मतदान व्यवहार प्रक्रीया:– .**

राष्ट्रीय व राज्यातील ज्या प्रमाणे जनतेच्या अनेक समस्या आहेत. जसे प्रामुख्याने बेकारी, बेरोजगारी द्रारीद्रय आणि शैक्षणिक व आरोग्य समस्या इत्यादी स्वरूपाच्या समस्या चंद्रपूर लोकसभा मतदार संघात दिसून येते. चंद्रपर लोकसभा मतदार संघात स्थित फार मोठा युवक वर्ग हा शैक्षणिक दृष्टया संपन्न असून त्यांना बेरोजगारी सारख्या समस्यांना तोंड दयाव्या लागतात. त्यामुळे या भागात दारीद्रय व बेकारी या गोष्टी फार मोठया प्रमाणात दिसून येतात.

त्याच प्रमाणे आरोग्याच्या दृष्टीने पाहिल्यास या भागामध्ये कोळसा उद्योग, उर्जा निर्मिती प्रकल्प यामुळे मोठया प्रमाणात प्रदुषण दिसून येते.अशा सर्व समस्यांना सर्व राजकीय पक्ष आपल्या हाताशी घेवून या भागात राजकारण करतांना दिसते व जनता आशेने या पक्षाचा धोरणाकडे पाहून आपले मतदान व्यवहार करतांना दिसते.

**८) मादक पदार्थ व द्रव्य याचे राजकारण:–**

चंद्रपूर लोकसभा मतदार संघात सध्या मादक पदार्थ व द्रव्य हा ज्वलंत प्रश्न हा मतदारांसमोर दिसून येतात. या मुद्याला अनुसरून बीजेपी या पक्षाने २०१४ नंतर दारूबंदी या विषयावर राजकारण केल्याचे दिसून येते त्यात अनेक लोकांच्या दारूबंदी बाबत संमिश्र प्रतिक्रीया उमटल्याचे दिसून येत होते. त्यावेळेस बीजेपी पक्षाला भिन्नता आढळून आली व त्यावेळेस पक्षाचे उमेदवार

e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article

निवडणूकीत निवडून पण आले. त्यानंतरच्या २०१९ च्या लोकसभा निवडणूकीत मात्र या गोष्टीचा विरोधात कांग्रेस पक्षाचे उमेदवार यांनी या विषयी राजकारण केले.. व दारूबंदी मोहिम हटाव या धोरणाद्वारे मतदाराला आकर्शित केल्याचे दिसून येते. व मोठया प्रमाणात जनतेने दारूबंदी मोहिम हटाव या गोष्टीचे समर्थन करून या पक्षाच्या उमेदवाराकडे मतदानाचा कौल दिला. व सध्या कांगेस पक्षाच्या उमेदवार या गोष्टीमुळे काही प्रमाणात निवडणूक जिंकण्यास सफल झाल्याचे दिसन येते. अशा रितीने एकीकडे दारूबंदी द्वारे विधानसभेंत बीजेपी पक्षाचा उमेदवार निवडून येतो. व दुसरी कडे याच मतदार संघात दारूबंदी मोहिम हटाव या द्वारे कांग्रेस पक्षाचा उमेदवार निवडूण येतो. अशा प्रकारे मादक द्रव्याचा राजकीय विषय बनवून मतदान व्यवहार प्रकीया निश्चित केल्याचे दिसते.

**९) निवडणूक प्रचार:—**

चंद्रपूर लोकसभा मतदार संघातील निवडणूकीत प्रचाराचा मतदान व्यवहारात मोठया प्रमाणात प्रभाव पडतो. आजच्या काळात जनप्रसारमाध्यमे प्रीन्ट मीडीया व ईलेक्ट्रानिक मीडीयामुळे अतिशय प्रभावी झालेली आहे. आणि त्या पृक्षाचा प्रचार प्रभावी होतो. आणि त्यापक्षाची निवडणूक जिंकण्याची संधी वाढते. त्यामूळे वृत्तपत्र टेलिव्हीजन द्वारा आणि निवडणूक सभेद्वारे सर्व पक्ष आपआपल्या पक्षाचा प्रचार करीत असतात. पुर्व प्रचारामध्ये कॅमेन्ट चा वापर अधिक प्रमाणात केल्या जात होता. परंतू आता २०१४ च्या लोकसभा निवडणूकी पासून भाजपा सारख्या राजकीय पक्षाने ईलेक्ट्रानिक मीडीयाच्या माध्यमातून पोहचण्यासाठी अच्छे दिन आने वाले है, सबका साथ सबका विकास, कुठे नेवून ठेवला महाराश्ट्र अष्या स्लोगणच्या माध्यमातून देषातील व राज्यातील त्याचप्रमाणे चंद्रपूर लोकसभा मतदार संघातील मतदाराला प्रभावित केलेले आहे. व अशा निवडणूकीचा प्रचाराचा प्रभाव या मतदार संघावर पडलेला दिसतो. आणि त्या प्रभावाने मतदारांनी आपले मतदान केलेले आहे.

**१०) प्रसार माध्यमांची भुमिका:—**

आधुनिक युगामध्ये ईलेक्ट्रानिक मीडीया व प्रीन्ट मीडीया यांच्या माध्यमातून भरघोष आश्वासने, आकर्शित सुभाषिते प्रसारीत करून मतदारांना आकार्षित करण्याचे काम प्रसार माध्यमे करतांना दिसून येतात.

उदाहरण:— अच्छे दिन आने वाले है, अबकी बार मोदी सरकार,डिजिटल इंडिया, शायनिंग इंडिया,गरीबी हटाव अशा स्वरूपाचे नारे सतत प्रसार माध्यमाद्वारे सतत ठेवल्या जातात. व मतदार अशा प्रकाराच्या आमिषाला बळी पडतात. व त्यांचे मतवर्तन होते. याला चंद्रपूर लोकसभा मतदार संघ सुध्दा अपवाद नाही.

**११) निवडणूक काळातील भष्ट्राचार:—**

चंद्रपूर लोकसभा मतदार संघामध्ये निवडणूक काळातील कालावधीमध्ये प्रचंड पैशाचा वापर, मादक पदार्थ विविध प्रलोभने याद्वारे अनेक अशा बाबीमुळे मतदारांच्या मतवर्तनावर प्रभाव पडल्याचे दिसून येते. बराचसा जनसमुदार पैशाच्या आधारावर मतवर्तन करतांना दिसून येते.

**निष्कर्ष:—**

१) २०१९ च्या चंद्रपूर लोकसभा मतदार संघात मध्ये दारूबंदीचा प्रभाव पडलेला दिसतो.

२) २०१९ च्या चंद्रपूर लोकसभेत सर्वात जास्त कुणबी मतदार असल्याने व एका विशिष्ट राष्ट्रीय पक्षाचा उमेदवार हा कुणबी असल्याने जातीय समिकरण चालले.

३) २०१९ मध्ये एका विशिष्ट राष्ट्रीय पक्षाचे नेते हे केंन्द्रीय राज्यमंत्री असुन सुध्दा मतदारांचे व कार्यकर्त्याचे कामे न झाल्याने नेत्याबाबत नाराजी.

४) प्रत्येक्ष राष्ट्रीय पक्षात अंतर्गत राजकारण असते परंतू २०१९ मध्ये एका विशिष्ट राष्ट्रीय पक्षाचा उमेदवाराला याचा फार मोठा फटका बसलेला दिसून येतो.

**संदर्भ :**

इनामदार, व डॉ. पुराणीक : राजकीय समाजशास्त्र, कान्टिनेटल प्रकाशन, विजयानगर पूणे—३०, १९८४

फडके, य. दि. : राजकारणाचे बदलते रंगरुप, अक्षर प्रकाशन मुंबई.

बोरकर, र. रा. : चंद्रपूर—गडचिरोली जिल्हयाचे पुरतत्व, सुयश प्रकाशन, नागपूर २००९

लोटे, रा. ज. : तुलनात्मक शासन आणि राजकारण,पिंपळापूरे पब्लिशर्स नागपूर,२०१०.

लोटे, रा. ज. : भारतीय लोकशाही, पिंपळापूरे पब्लिशर्स, नागपूर, जून २०१४.

साबळे : भारतीय शासन आणि राजकारण, हिमालया पब्लिशिंग हाऊस,२००४.

मोहन हिराबाई हिरालाल : स्वशासनाची दिशा, जुन २००२, नितीन तापस श्याम ब्रदर्स गणेश पेठ, नागपूर

https://www- marathisrushti.com/cities

http://mr.m.vikipedia.org

http://chanda.nic.in